MHSN090005672021

## नियमित दिवाणी मुकदमा क्र.९२/२०२१ मधील नि.क्र.२९ खालील आदेश
## (श्री.विजय पाटील *विरुध्द* श्री. उदय पाटील)

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांचेविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे तुर्तातूर्त ताकीद मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत वादीने प्रतिवादी विरुध्द मा.न्यायालयात जाहीर ठरावाचा व तत्परिणामी फल म्हणुन हक्क शाबीतीचा, निरंतर ताकीदीचा व नुकसान भरपाईचा दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकत म्हणजे जमिन गट नं.१५४२/ब या जमिनीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे वडीलांनी १५ वर्षापुर्वी मा.गावकांगार तलाठी यांच्याकडे लेखी अर्ज देऊन सदर गटातील आठ आणे-आठ आणे हिस्सा वादी व प्रतिवादीला देऊन त्याची ७/१२ सदरी नावे लावुन सदर जमिन पुर्व-पश्चिम चालीत वाटलेली आहे. सदर जमिनीत वादी व प्रतिवादी यांचे गटाचे पश्चिम बाजूस सध्या वापरत असलेल्या जमिनीचे कॅनॉल शेजारी मध्यभागी विहिर आहे. सदर विहिरीची नोंद ७/१२ सदरी आहे. सदर विहीरीतील गाळ काढण्यासाठी परवानगी मिळणेकरीता वादींनी नि.क्र १३ ला अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज गुणदोषावर चालून नामंजूर झालेला आहे. याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी हे वादींना विहीरीतल पाणी उपसा करणेबाबत हरकत अडथळा करीत ओहत. सदर विहीरीवरील वडीलांचे नावे असलेल्या विदयुत जोडणीचे बील वादी यांनी भरुन विहीरीतील पाणी उपसा करण्यासाठी गेले असता, प्रतिवादी वादींना, या विहीरीमध्ये तुझा काही संबंध नाही. न्यायालयाने आदेश केल्याशिवाय तु

विहीरीवर यायचे नाही तसेच पाणी घ्यायचे नाही असे म्हणून हरकत अडथळा करीत आहेत व वादीस पाणी घेवु देत नाहीत. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादीविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार केली असता, सदर बाब ही दिवाणी स्वरुपाची असल्याने पोलीसांनी त्यांची तक्रार घेतली नाही. प्रतिवादी हे वादीस विहीरीतील पाणी घेणेस हरकत अडथळा करीत असल्याने वादीचे अपरीमित असे नुकसान होत आहे. त्यामुळे यातील प्रतिवादी यांनी दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो सदर विहीरीतून पाणी घेणेस, गरज पडलेस विहीरीतील गाळ काढणेस व विहीरीतील खोदकाम करणेस हरकत करु नये अथवा विहीरीवरील विदयुत जोडणी सुरु करणेसंदर्भात वादी अगर विदयु वितरण कंपनी, चिंचणी तासगांव यांना हरकत अडथळा करु नये अशी तूर्तातुर्त ताकिद देणेचा आदेश होणेबाबत विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने निशाणी ३३ कडे आपले म्हणणे दाखल करुन ताकीद अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी यांनी सदरचे गट नं.१५४२/ब मधील विहिर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतुन खोदलेली आहे. तसेच सदरची विहिर जमिनीपासुन ५ फुठापर्यंत पुर्णपणे बांधीव अशी आहे. सदरच्या विहिरीत कोणत्याहीप्रकारे गाळ माती जाणेचा कोणताही प्रश्न आजपर्यंत निर्माण झालेला नाही. तसेच, सदरचे विहिरीमध्ये सध्या जमिन लेव्हलच्या ४ ते ५ फुठ अंतरापर्यंत पाणी असुन त्याचे वरती जवळ पास १० ते १५ एकर जमिन ओलीताखाली पिकू शकते. वादी यांचा सदर विहीरीमध्ये कोणताही व कसलाही हक्क व अधिकार नव्हता व नाही. प्रतिवादी यांनी सदर विहीर पंचायत समितीमार्फत स्वतःचे कष्टाने व स्वतःचे हिश्यात खुदाई केलेली आहे. सदर विहीरीत वादी यांचा कोणताही हक्क नाही. तसेच सदर विहीर प्रतिवादी यांचे मालकी वहिवाटीची असलेने त्यावर विदयुत जोडणी घेणेचा वादीस हक्क व अधिकार नव्हता व नाही. यापुर्वीचा वादीचा नि.क्र. १३ कडील ताकिदीचा अर्ज गुणदोषावर चालून तो नामंजूर झालेला आहे. त्यामुळे वादीस सदर अर्ज करणेचा कोणताही हक्क व अधिकार नाही. वादी यांनी मुळ दाव्यात अर्जात कथन

केलेप्रमाणे कोणतीही मागणी अथवा कथन नाही. त्यामुळे वादी एकाच दाव्यात वेगळा दावा आणणेचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्यातील परस्परविरोधी कथनांचा विचार करता, नि.२९ चे अर्जाच्या अंतिम निष्कर्षास येण्याकरिता खालीलप्रमाणे मुद्दे माझे विचाराधीन निर्माण झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेतः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | नकारार्थी |
| २ | वादीने अनुकूलतेचा कल त्याच्या बाजूने असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| ३ | वादीने तुर्तातुर्त मनाई नाकारल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| ४ | काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

५. वादीने यापुर्वी आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. नि.६ कडे गट नं.१५४२/ब चा ७/१२ खाते उतारा.

२. नि.७ कडे गट नं.४६५ चा ७/१२ उतारा.

३. नि.८ कडे गट नं.१५४२/ब वरील फेरफार क्र.३१६३ ची सहीशिक्क्याची प्रत.

४. नि.२४/१ कडे वादीचे वडील विठ्ठल महादेव पाटील यांचे प्रतिज्ञापत्र.

५. नि.२४/२ कडे गट नं.१५४२/ब चा ७/१२ खाते उताऱ्याची झेरॉक्स प्रत

६. प्रतिवादीने यापुर्वी आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. नि.२७/४ व नि.२७/५ कडे वाद मिळकतीचे फोटो.

## मुद्दा क्र.१ ते ३ करिता–

७. मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळणेसाठी ते एकत्रितरित्या विचारात घेतले आहेत.

८. वादी यांनी त्यांचे अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दावा गट नं.१५४२/ब या जमिनीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे वडीलांनी सुमारे १५ वर्षापुर्वी गांवकामगार तलाठी यांच्याकडे अर्ज देऊन वादी व प्रतिवादी यांच्या प्रत्येकी आठ आणे हिस्साची ७/१२ उतारे सदरी नावे लावुन घेतली आहे. असे असताना सदर जमिनीच्या पश्चिम बाजुस केनॉल शेजारी मध्यभागी विहिरी आहे.

९. याउलट प्रतिवादी यांनी असे अभिकथन केले आहे की, गट नं.१५४२/ब मधील विहिर प्रतिवादी यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेतुन काढलेली आहे व सदरची विहिर जमिनीपासुन ५ फुठापर्यंत बांधीव असल्याने त्यात कोणत्याहि प्रकारे गाळ माती जाणेचा प्रश्नच निर्माण होत नाही. सदरच्या विहिरीमध्ये जमिन लेव्हलच्या ४ ते ५ फुठ अंतरापर्यंत पाणी असुन त्याचेवर जवळपास १० ते १५ एकर जमिनीमध्ये ओलीताखाली पिकु शकते.

१०. वादी तर्फे वकील श्री. एम.एम.नदाफ यांनी असा युक्तीवाद केला आहे की, सदर विहिरीमध्ये वादी यांचा हिस्सा असल्याने वादी यांना विहिरीमधुन पाणी घेणेचा हक्क आहे. याउलट प्रतिवादीतर्फे वकील श्री. ए. बी. डांगे यांनी असा

युक्तीवाद केला आहे की, सदर विहीर ही प्रतिवादी यांनी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून घेतलेली आहे. सदर विहीर ही प्रतिवादी याचे एकटया मालकी वहिवाटीची आहे. वादी हे केवळ प्रतिवादी यांना नाहक त्रास देणेकरिता अशाप्रकारे अर्ज दाखल केला आहे.

११. वादी यांनी फेरिस्त निशाणी क्र. ६ व फेरिस्त निशाणी क्र.२४/२ कडे गट नं.१५४२/ब चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर ७/१२ उताऱ्याचे अवलोकनावरुन असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी यांचा सदर मिळकतीमध्ये वेगवेगळी वहिवाट आहे तसेच, समाईकातील विहिरपड आहे. पुढे वादी यांनी निशाणी क्र. ८ कडे फेरफार क्र. ३१६३ चा उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन हि बाब स्पष्ट होते की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये गट नं.१५४२/ब या मिळकतीचे वाटप झाले आहे. सदर मिळकतीमध्ये विठ्ठल महादेव पाटील यांच्या नावाचे वीज कनेक्शन असलेबाबतचे वादी यांनी फेरिस्त निशाणी क्र. २४/३ कडे म.रा.वि.वि. कंपनीचे कनेक्शन पावतीची झेरॉक्स प्रत दाखल केले आहे.

१२. प्रतिवादी यांनी नि.क्र. २७/१ त्यांना पंचायत समिती तासगांव यांचकडून रक्कम रुपये ९५,७६०/- व नि.क्र. २७/२ कडे रक्कम रुपये २६५५०/- रुपयाच्या धनादेशांच्या झेरॉक्स प्रती दाखल केलेल्या आहेत. सदर रकमा प्रतिवादी यांना विहीर अनुदानासाठी मिळाली असल्याचे दिसुन येते. तसेच प्रतिवादी यांनी नि.२७/४ व २७/५ कडे दाखल केलेले विहीरीचे छायाचित्र पाहता सदर विहीर ही जमीनीपासून ५ फुटापर्यंत बांधीव असल्याचे दिसुन येते व सदर विहीर ही छोटे पाटबंधारे विभाग, पंचायत समिती, तासगांव यांचेमार्फत नविन बांधण्यात आली असुन त्यावर लाभार्थी म्हणून प्रतिवादी याचे नावे आहे. यावरुन सदर विहीर ही प्रतिवादी याचे मालकीची असल्याचे प्रथमदर्शी सिध्द होते. त्यामुळे वादी यांनी त्यांची केस सकृतदर्शनी सिध्द केली नसल्यामुळे वादी यांचा अर्ज

नामंजुर होण्यास पात्र आहे. तसेच या कामी वादीचा नि.क्र. १३ चा सदर विहीरीतील गाळ काढण्याबाबतचा अर्ज गुणदोषावर नामंजूर झालेला आहे. असे असताना पुन्हा वादी अशा प्रकारचा अर्ज देवुन त्याचा सदर विहीरीत नसलेला हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसुन येते.

१३. वादी यांनी त्यांची केस सकृतदर्शनी सिध्द केली नसल्यामूळे अर्जात मागितल्याप्रमाणे मनाई हुकूम दिल्यास सदर आदेशाचा दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मी या निष्कर्षास येते की, वादीच्या लाभात सकृतदर्शनी केस नसल्यामुळे अनुकुलतेचा कल हा वादीच्या बाजुने नाही. वर नमुद केल्याप्रमाणे वादीने सकृतदर्शनी केस शाबीत केली नसल्यामुळे वादीच्या लाभात मनाई हुकूम दिला नाही तर वादीचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.४ चे उत्तराकरिता खालील आदेश पारीत करीत आहेः-

**आदेश**

वादीचा **नि.२९** कडील अर्ज नामंजूर करणेत येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला)

RITA SHESHRAO KULKARNI

Digitally signed by RITA SHESHRAO KULKARNI
Date: 2023.02.15 17:14:29 +0530

**तासगांव.** **(डॉ.आर.एस.कुळकर्णी)**

**दि. १५.०२.२०२३** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. अभय अरविंद रणदिवे

न्यायालय – सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव,
जिल्हा सांगली.

दिनांक – १५.०२.२०२३.

न्यायीक अधिकारी यांनी
सही केलेली दिनांक – १५.०२.२०२३.

आदेश अपलोड दिनांक– १५.०२.२०२३.